उपक्रम

# शेतीकडे उद्योग म्हणून बघणे हाच समृद्धीचा मार्ग : डॉ. प्रमोद रसाळ

## तीनदिवसीय प्राचार्य परिषदेचे 'बसवंत गार्डन'मध्ये उद्‌घाटन

जगातील पहिला गोड पदार्थ मध हा आहे. मध व मधमाशीचे मानवी जीवनातील महत्त्व लक्षणीय आहे. पिकांच्या परागीभवनातील मधमाशीचे स्थान लक्षात घेता हरितक्रांती, श्वेतक्रांती तसेच कृषी क्षेत्रातील इतर क्रांतींप्रमाणेच आता देशातील सर्व शिक्षण संस्थांनी पाठबळ देऊन 'मधुक्रांती' यशस्वी करणे गरजेचे आहे. तसेच मधमाशीपासून मिळणाऱ्या उपयुक्त पदार्थांचे रोगनिवारणात कळीचे स्थान आहे. बसवंत गार्डनसारख्या कृषी पर्यटन केंद्रांच्या माध्यमातून 'कम्युनिटी टुरिझम'चा अंगीकार करताना त्यात शेतकऱ्यांचा सहभागही आवश्यक आहे. त्या दृष्टीने पिंपळगावातील या केंद्राचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ.श्री. प्रमोद रसाळ यांनी केले.

'पूर्वा केमटेक' व 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'च्या संयुक्त विद्यमाने बसवंत गार्डन (मुखेड रोड, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक) येथे आयोजित राज्यस्तरीय प्राचार्य-मुख्याध्यापक परिषदेचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी कुलसचिव तसेच 'पूर्वा कृषिदूत' मासिकाचे संस्थापक संपादक डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार होते.

बसवंत मधमाशी पालन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून




**पिंपळगाव (ब.), ता. निफाड, जि. नाशिक येथील बसवंत मधमाशी उद्यानातील 'बिनिव्हर्स' या मधमाशीच्या प्रतिकृतीचे अनावरण करताना राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ.श्री. प्रमोद रसाळ. समवेत (डावीकडून), श्री. महेश पाटील, श्री. सुहास कदम, सौ. माने, श्रीमती सुनीता धनगर, डॉ.श्री. महानंद माने, डॉ.श्री. बी.बी. पवार, श्री. संजय पवार, डॉ.श्री. भास्कर गायकवाड, श्री. ज्ञानेश्वर नाठे तसेच उपस्थित प्राचार्य- मुख्याध्यापक यांसह कर्मचारीवृंद.**

श्री. संजय पवार यांनी मधमाशीचे महत्त्व अनोख्या पद्धतीने उलगडून दाखविल्यामुळे ते अभिनंदनास पात्र आहेत. मधमाश्या या सांघिक पद्धतीने काम करून निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करतात. तसेच 'लीडरशिप' कशी असावी हे आपण मधमाश्यांकडून शिकले पाहिजे. जोपर्यंत शेतीकडे आपण एक उद्योग म्हणून बघत नाही, तोपर्यंत शेतीला समृद्धीचे दिवस येणार नाहीत, असेही डॉ. रसाळ यांनी नमूद केले.

बसवंत मधमाशी उद्यान पाहिल्यानंतर निसर्ग आणि मानवी जीवन यांचे अतूट नाते प्रकर्षाने जाणवले; मात्र सृष्टीशी नाळ तुटलेली सद्य:स्थिती बघता 'सिलसिला' चित्रपटातील 'ये कहाँ आ गये हम' या गाण्याची आठवण झाली, अशी भावना महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या जलसिंचन व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. महानंद माने यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांचे स्वागत 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'चे तांत्रिक संचालक तसेच 'पूर्वा कृषिदूत' मासिकाचे संपादक डॉ.श्री. भास्कर गायकवाड यांनी केले. 'मधमाशी पालनातून उद्योजकता विकास' या विषयावर त्यांनी उपस्थित प्राचार्य आणि मुख्याध्यापक तसेच शेतकरी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'ॲपिकल्चर' आणि 'ॲपिटुरिझम'च्या क्षेत्रात आपली आस्थापना करीत असलेले कार्य तसेच या उपक्रमामागची भूमिका 'पूर्वा केमटेक'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांनी समर्पकपणे मांडली. शेतकऱ्यांनी फक्त कृषी उत्पादने न पिकविता, उत्पादनांच्या दरांबाबतचे बाजारपेठेतील परावलंबित्व लक्षात घेऊन- त्या उत्पादनांचे ब्रॅंडिंग करणेही गरजेचे आहे, असे ते म्हणाले. कृषी उत्पादनांवर प्रक्रिया करून तसेच शेतीला उद्योगाची जोड देऊन उत्पादनांचे ब्रॅंडिंग केल्यास अधिक आर्थिक नफा मिळू शकेल. त्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण व मार्गदर्शन बसवंत गार्डनच्या माध्यमातून अवश्य उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन देखील त्यांनी यावेळी दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.श्री. बी.बी. पवार यांनी सृष्टिसंवर्धनाच्या संदर्भातील मधमाशीच्या कार्याचे मोल अधोरेखित केले. मधमाशी पिकांच्या परागीभवनात मोलाचा वाटा उचलते, मधासह इतर मानवोपयोगी पदार्थही तिच्यामुळेच उपलब्ध होतात. अलीकडे सर्वत्र मधमाशी पालनाबद्दल जागृती होत असल्याचे समाधान आहे. मात्र शालेय- महाविद्यालयीन शैक्षणिक स्तरांपासूनच यासंदर्भात प्रबोधनाची गरज लक्षात घेता, शिक्षण क्षेत्रातल्या धुरिणांना आवाहन करण्याचा आजच्या कार्यक्रमाचा हेतू आहे असे त्यांनी नमूद केले.

प्रारंभी मधमाशी उद्यानातील 'बिनिव्हर्स' या मधमाशीच्या अतिशय कल्पकतेने उभारलेल्या प्रतिकृतीचे अनावरण डॉ.श्री. प्रमोद रसाळ यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्राचार्य परिषदेसाठी विभागीय तंत्रशिक्षण सहसंचालक श्री. ज्ञानेश्वर नाठे, नाशिक मनपाच्या शिक्षणाधिकारी सुनीता धनगर, धुळ्याच्या कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्री. देवकर, ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.चे संचालक श्री. विजय पवार, श्री. सुहास कदम, श्री. महेश पाटील, श्री. संदीप वाघ तसेच मानव संसाधन विभागाचे प्रमुख श्री. भास्कर भामरे, श्री. संदीप सोनवणे, जाहिरात विभागाचे व्यवस्थापक श्री. राजेंद्र बागूल आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच महाराष्ट्रातील विविध विभागांतून दोनशेहून अधिक शिक्षण संस्थांमधील प्राचार्य- मुख्याध्यापक, शेतकरी व विद्यार्थी सहभागी झाले होते.

'पूर्वा केमटेक प्रा.लि.' आणि 'बसवंत गार्डन' यांच्या संयुक्त विद्यमाने 'सेवर- ग्रोवर बैलजोडी' व 'सेवर- ग्रोवर चित्रकला स्पर्धा' नुकत्याच उत्साहात पार पडल्या. महाराष्ट्रातील सर्व विभागांतून शेतकरी बंधू-भगिनी तसेच हजारो विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सेवर- ग्रोवर बैलजोडी स्पर्धेत शेकडो बैलजोडीधारक शेतकऱ्यांनी तर चित्रकला स्पर्धेत दीडशेहून अधिक शाळांतील साडेसात हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल 'पूर्वा केमटेक'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांनी पारितोषिक विजेत्यांसह सर्व स्पर्धकांचे देखील अभिनंदन केले. या स्पर्धेत आकर्षक ठरलेल्या विजेत्या १२ बैलजोड्यांना प्रत्येकी रुपये ५०००/- बक्षिसादाखल देण्यात आले. तसेच खरसुंडी, डांगी, नागोर, मद्रास, कोकणी गिद्धा, माळवा आणि गावरान या प्रत्येक जातीतील एका बैलजोडीला प्रोत्साहनपर रुपये ३०००/- चे पारितोषिक देण्यात आले. सेवर- ग्रोवर चित्रकला स्पर्धा इ. ५ वी ते ७ वी, इ. ८ वी ते १० वी व खुला गट या तीन गटांत पार पडली. यातील प्रत्येक गटातून पाच विजेत्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी 'पूर्वा- ग्रीनझोन'चे सरव्यवस्थापक श्री. सुनील पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. सूत्रसंचालन एच.आर. विभागाचे श्री. रुपेश ठाकरे यांनी केले. **(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)**

# सेवर- ग्रोवर बैलजोडी स्पर्धेतील विजेते

## (आकर्षक १२ बैलजोड्यांना प्रत्येकी रु. ५०००/- चे पारितोषिक)

**१. श्री. सुरेश विनायक खोकरे**
गोंदेगाव, ता. जामनेर, जि. जळगाव
**२. श्री. रवींद्र भास्कर ढेपले**
निफाड, ता. निफाड, जि. नाशिक
**३. श्री. सुरेश विश्वनाथ चिपाडे**
सुपे, ता. बारामती, जि. पुणे
**४. श्री. केदा धोंडू जाधव**
मुंजवाड, ता. सटाणा, जि. नाशिक
**५. श्री. अशोक दादा चव्हाण**
समडोळी, ता. मिरज, जि. सांगली
**६. श्री. ज्ञानेश्वर रामराव गुंजाळ**
विसापूर, ता. कळवण, जि. नाशिक
**७. श्री. हनुमंत तुकाराम तळेकर**
विंग (तळेकर वस्ती), ता. खंडाळा, जि. सातारा
**८. श्री. नंदलाल रामदास बागूल**
ठेंगोडा, ता. सटाणा, जि. नाशिक
**९. श्री. लवकेश रामदेवराव डोंगरे**
सावरगाव हडप, ता. जालना, जि. जालना
**१०. श्री. ज्ञानेश्वर भगवान शिंदे**
कळवण, ता. कळवण, जि. नाशिक
**११. श्री. आत्माराम सखाराम सुराशे**
देऊळगाव माळी, ता. मेहकर, बुलढाणा
**१२. श्री. रोहित दिलीप वाल्टे**
चापडगाव, ता. निफाड, जि. नाशिक

## (प्रत्येक जातीच्या एका बैलजोडीला प्रोत्साहनपर रु. ३०००/- चे पारितोषिक)

**१. श्री. विठ्ठल दत्तात्रेय पाटील,**
(बैलजोडी जात- खरसुंडी)
मु. सरोळी पो. निगुंडगे, ता. आजरा,
जि. कोल्हापूर
**२. श्री. रघुनाथ बहिरू वाकचौरे,**
(बैलजोडी जात- डांगी)
पिंपळगाव डुकरा, ता. इगतपुरी, जि. नाशिक
**३. श्री. शंतनु अशोकराव खवणे,**
(बैलजोडी जात- नागोर)
सातेगाव, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती
**४. श्री. सुनील दिनकरराव पाटील,**
(बैलजोडी जात- मद्रास)
खेडी, प्र.ज., ता. अंमळनेर, जि. जळगाव
**५. श्री. बाळासाहेब साळुंखे,**
(बैलजोडी जात- कोकणी गिद्धा)
घैगाव, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद
**६. श्री. श्याम गजानन पळसकर,**
(बैलजोडी जात- माळवा)
सातेगाव, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती
**७. श्री. भागीनाथ बाबासाहेब आसने,**
(बैलजोडी जात- गावरान) ब्राह्मणगाव, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर

# सेवर- ग्रोवर चित्रकला स्पर्धेतील विजेते

### गट क्र. १ : ५ वी ते ७ वी

**प्रथम क्रमांक : रु. ३००१/-**
**कु. रुद्र विठ्ठल महांगडे** (इ. ७ वी)
सरस्वती विद्यालय, कोरेगाव, जि. सातारा
**द्वितीय क्रमांक : रु. २००१/-**
**कु. पूनम कांतीलाल बहिरम** (इ. ७ वी)
शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक
आश्रमशाळा, कनाशी,
ता. कळवण, जि. नाशिक
**तृतीय क्रमांक : रु. १५०१/-**
**कु. प्रतीक्षा अशोक थोरात** (इ. ६ वी)
समता विद्या मंदिर, जोर्वे, ता. संगमनेर,
जि. अ.नगर
**चतुर्थ क्रमांक : रु. १००१/-**
**कु. गीतांजली विनोद पगारे** (इ. ६ वी)
श्री. दादासाहेब माणिकरावजी गावित
सार्वजनिक हायस्कूल, विसरवाडी
ता. नवापूर, जि. नंदुरबार
**पंचम क्रमांक : रु. ५०१/-**
**कु. साई दिनेश वारे** (इ. ७ वी)
जनता विद्यालय, नायगाव
ता. सिन्नर, जि. नाशिक

### गट २ : ८ वी ते १० वी

**प्रथम क्रमांक : रु. ५००१/-**
**कु. अक्षता अशोक ठोंबरे** (इ. ९ वी)
बालावधूत हायस्कूल, मौजे वडगाव
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
**द्वितीय क्रमांक : रु. ४००१/-**
**कु. श्रावणी भगवान आहेर** (इ. १० वी)
छ. शिवाजी विद्यालय, गणोरे, जि. अ.नगर
**तृतीय क्रमांक : रु. ३००१/-**
**कु. सिद्धेश सदाशिव कापसे** (इ. १० वी)
महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा, जि. अ.नगर
**चतुर्थ क्रमांक : रु. २००१/-**
**कु. यशवंत मनोज जाधव** (इ. ८ वी)
लोकनेते पंडित धर्मा पाटील मराठा
इंग्लिश मीडियम स्कूल, सटाणा, जि. नाशिक
**पंचम क्रमांक : रु. १००१/-**
**कु. वैशाली त्र्यंबक धुळे** (इ. १० वी)
कर्मवीर गणपत दादा मोरे जनता विद्यालय,
पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक
**कु. यश अनिल शेवाळे** (इ. १० वी)
रु. १००१/-, महात्मा फुले विद्यालय,
मोकभणगी ता. कळवण, जि. नाशिक

### गट ३ : खुला गट

**प्रथम क्रमांक- रु. ७००१/-**
**शाहरुख अन्वर पिंजारी**
मु.पो. कोळदा, ता. नंदुरबार, जि. नंदुरबार
**द्वितीय क्रमांक- रु. ५००१/-**
**श्री. राजन पवार**
६०/ए, आविष्कार, सावरकरनगर,
साक्री, जि. धुळे
**तृतीय क्रमांक- रु. ३००१/-**
**सौ. सोनाली शिंदे,**
नाशिक
**चतुर्थ क्रमांक- रु. २००१/-**
**श्री. सुभाष संपत चौधरी**
पिंपळगाव हायस्कूल, पिंपळगाव बसवंत,
ता. निफाड, जि. नाशिक
**पंचम क्रमांक (विभागून)- रु. १००१/-**
**कु. जयेश सैंदाणे**
समता विद्यालय टेहरे, ता. मालेगाव,
जि. नाशिक
**श्री. रतिलाल ताराचंद सोनवणे**
सी.बी. निकुंभ माध्यमिक विद्यालय,
घोडेगाव, ता. चोपडा, जि. जळगाव